आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२० जून २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- चांगल्या कामगिरीच्या आधारेच जनतेनं सलग तिसऱ्यांदा निवडून दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं जम्मू काश्मीर इथं प्रतिपादन
- देशात गव्हाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारचं आढावा बैठकीत निवेदन
- बिहार सरकारनं सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमधे लागू केलेलं वाढीव आरक्षण उच्च न्यायालयाकडून रद्दबातल
- वाढवण बंदर प्रकल्पामुळे राज्याच्या जीडीपीमध्ये एक टक्का वाढ होईल, असा जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाला विश्वास

  **आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एटमधल्या ग्रुप एकमध्ये अफगाणिस्तानविरूद्धच्या सामन्यात भारताचा फलंदाजीचा निर्णय

**<><><><><>**

आपलं सरकार चांगली कामगिरी करून दाखवतं या कामगिरीच्या आधारेच आपल्याला देशातल्या जनतेनं सलग तिसऱ्यांदा निवडून दिलं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जम्मू-काश्मीरमधे म्हणाले. लोकसभा निवडणुकीनंतरची त्यांची ही पहिलीच जाहीरसभा होती.

आगामी काळात जम्मू कश्मीर एक राज्य म्हणून आपलं भविष्य घडवेल, या राज्यानं जो विकासाचा मार्ग निवडला आहे, तो मार्ग आपण अधिक उत्तम करणार आहोत., असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री जम्मू-काश्मीरच्या दोन दिवसाच्या दौऱ्यावर असून त्यांच्या हस्ते पंधराशे कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी होणार आहे. जागतिक योग दिनानिमित्त प्रधानमंत्री उद्या आयोजित एका कार्यक्रमातही सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

एखाद्या देशाचा किंवा समाजाचा विकास त्या देशाच्या नागरिकांनी दिव्यांग जनांविषयी बाळगलेल्या संवेदनशीलतेच्या आधारेच गणला जाऊ शकतो, असं मत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नवी दिल्ली इथं मांडलं. त्या पंडित दिनदयाळ उपाध्याय राष्ट्रीय दिव्यांग संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात बोलत होत्या. समावेशी वृत्ती हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक असल्याचं मुर्मू यावेळी म्हणाल्या. मुर्मू यांनी या संस्थेतल्या दिव्यांग मुलांशी संवाद साधला. त्यांनी या संस्थेतल्या नविकृत कृत्रिम अवयव केंद्रालाही भेट दिली. दिव्यांग जनांच्या सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या संस्थेच्या कर्मचारी वर्गाचं मुर्मू यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

मराठा आणि ओबीसी समाजाच्या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी केंद्र सरकारनं पुढाकार घेण्याची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज बारामती इथं केलं. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. या समाजांच्या आंदोलनांमुळं सामाजिक तणाव निर्माण होऊ नये म्हणून केंद्र सरकारनं काळजी घ्यावी, असं पवार यांनी यावेळी सुचवलं.

**<><><><><>**

देशात गव्हाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची ग्वाही आज सरकारनं दिली. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली जीवनावश्यक वस्तूंच्या दराचा आढावा घेण्यासाठी मंत्र्यांची बैठक झाली. त्यावेळी ही माहिती देण्यात आली. रब्बी हंगामात १८ जून २०२४ पर्यंत २६६ लाख मेट्रिक टन तर २०२३मध्ये २६२ लाख मेट्रिक टन गव्हाची खरेदी केल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं सांगितलं. गव्हाच्या दरावर बारकाईनं लक्ष्य देऊन देशातल्या ग्राहकांसाठी स्थिर दराची ग्वाही मिळावी यासाठी योग्य तो धोरणात्मक हस्तक्षेप करावा असा सल्लाही सरकारनं यावेळी दिला आहे.

<><><><><>

बिहार सरकारनं मागास, अति मागास, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमधे लागू केलेलं वाढीव आरक्षण पाटणा उच्च न्यायालयानं आज रद्दबातल ठरवलं. सर्वोच्च न्यायालयानं निर्धारित केलेल्या ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत बदल करून बिहार सरकारनं हे आरक्षण ६५ टक्क्यापर्यंत वाढवलं होतं. हे आरक्षण लागू करणाऱ्या बिहार आरक्षण कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिकांवरचा निकाल उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती के विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती हरिश कुमार यांच्या खंडपीठानं ११ मार्च रोजी राखून ठेवला होता.

<><><><><>

कोळसा खाणींच्या व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी आज कोळसा मंत्रालयाच्या उच्च अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. कोळशाची आयात कमी करण्यासाठी कोळसा

उत्पादन वाढवण्याची गरज यावेळी मंत्री रेड्डी यांनी व्यक्त केली. तसंच कोळसा खाणी लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी राज्य सरकार, पर्यावरण मंत्रालयाशी समन्वय साधण्याच्या सूचना रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

**<><><><><>**

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंग यांनी आज नवी दिल्लीत कापड उद्योग परिषदेच्या प्रतिनिधींशी विविध विषयांवर चर्चा केली. वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी काय करायला हवं या विषयी सिंग यांनी  प्रतिनिधींशी सल्लामसलत केली. सिंग यांनी मंत्रीपदाची सूत्रं हाती घेतल्यानंतरची ही पहिलीच अशा पद्धतीची बैठक होती. वस्त्रोद्योग राज्यमंत्री पबित्रा मार्गारिटा यावेळी उपस्थित होत्या.

**<><><><><>**

वाढवण बंदर प्रकल्प हा भारताच्या भविष्यासाठी अतिशय महत्वाचा प्रकल्प असून यामुळे राज्याच्या जीडीपीमध्ये एक टक्का वाढ होईल, असा विश्वास जेएनपीए अर्थात जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणचे प्रमुख उन्मेष वाघ यांनी व्यक्त केला. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. कंटेनर वाहतुकीसाठी मुंद्रा आणि जेएनपीटी या बंदराची क्षमता कमी पडत असून यासाठी वाढवणसारख्या बंदराची गरज आहे. या बंदरानंतर पश्चिम भारताला नव्या बंदराची गरज उरणार नाही, तसंच मुंबईचं महत्त्व अबाधित राहील असं वाघ म्हणाले.

वाढवण बंदरासाठी जमीन अधिग्रहित केली जाणार नाही, त्यामुळे पालघर भागातल्या लोकांचं विस्थापन होणार नाही. तसंच या प्रकल्पामुळे मच्छिमारांच्या व्यवसायावर कोणताही परिणाम होणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. वाढवण बंदर

प्रकल्प हा पर्यावरणपूरक प्रकल्प असल्याचंही त्यांनी सांगितलं. तसंच या प्रकल्पामुळे दहा लाख नोकऱ्या निर्माण होतील असंही वाघ यांनी सांगितलं.

<><><><><>

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर एटमधील ग्रुप एकमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना सुरु आहे. बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं हा सामना आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २ षटकात ८ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

दिल्लीतील मद्य धोरण मनी लाँड्रिंग प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज दिल्लीच्या राऊज एव्हेन्यू न्यायालयानं जामीन मंजूर केला.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-पीजी परीक्षेची प्रश्नपत्रिका आणि आदर्श उत्तरपत्रिका प्रसिद्ध करण्याचे निर्देश राष्ट्रीय परीक्षा मंडळाला द्यावेत अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आज राष्ट्रीय परीक्षा मंडळ एनबीई आणि मेडीकल काऊन्सिलिंग कमिटीला नोटीसा जारी केल्या. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती एस व्ही एन भट्टी यांच्या सुट्टीकालीन पीठासमोर ही याचिका सुनावणीला आली आहे. ती दाखल

करुन घेत न्यायालयाने प्रतिपक्षाकडून येत्या ८ जुलै पर्यंत प्रतिज्ञापत्र मागवली आहेत.

पदवीअभ्यासक्रमासाठीच्या नीट परीक्षेसंदर्भात देशातल्या विविध उच्च न्यायलयांमधे दाखल झालेल्या याचिकांची सुनावणी एकत्रितपणे घेण्याबाबतही ८ जुलैलाच पुढची सुनावणी होणार आहे. मात्र पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची परीक्षा एन टी ए म्हणजे राष्ट्रीय चाचणी संस्था घेत नसल्याने या याचिकेत त्यांना प्रतिपक्ष बनवू नये अशी मागणी एन टी एच्या वकिलांनी केली.

<><><><><>

काँग्रेस नेते राहुल गांधी यांना विद्यार्थ्यांच्या भविष्याशी काही देणंघेणं नसून ते नीट प्रकरणाचं राजकारण करत आहेत, अशी टीका भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी आज केली. सरकार नीट प्रकरणाबाबत संवेदनशील असून विद्यार्थ्यांवर कुठलाही अन्याय होणार नाही. तसंच दोषींवर कारवाई केली जाईल अशी ग्वाही त्रिवेदी यांनी दिली.

त्याआधी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नीट परीक्षेतल्या अनियमिततेला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. तसंच हे राष्ट्रीय संकट असून सरकारने यावर काहीही प्रतिक्रिया दिली नसल्याचं गांधी म्हणाले.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज विदर्भात दाखल झाला असून पुढच्या दोन दिवसात उर्वरित महाराष्ट्रात व्यापण्याच्या दृष्टीनं स्थिती अनुकूल आहे.

गेल्या दोन दिवसांपासून रिप रिप करीत पडणा-या पावसानं गुरुवारपासून जोर वाढला आहे. मुंबईत बोरिवली, मालाड, कांदिवली, गोरेगाव परिसरात सर्वाधिक पाऊस पडला. पुढच्या २४ तासांत पालघर जिल्ह्याला रेड अलर्ट तर रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**//<><><><><>//**